जा. क्र. प्रशासन/कलम २४ क –
शिक्षण प्रशिक्षण/२०१५/१३२
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय
दिनांक १५/०५/२०१५

वाचावे :–

१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चा कलम २४ क
२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चा कलम ७५ (२) (Viii)
३. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ मधील ३० क
४. महाराष्ट्र शासन – सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाकडील अधिसूचना दि. १० सप्टेंबर २०१४

**–: परिपत्रक :–**

**विषय :– सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांमधील सदस्य, अधिकारी आणि कर्मचारी यांचे सहकार शिक्षण व प्रशिक्षणाबाबत कलम २४क (१) नुसार करावयाची कार्यवाही.**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २४ क (१) नुसार 'प्रत्येक संस्था, राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा, राज्य संघीय संस्थांमार्फत किंवा राज्य शिखर प्रशिक्षण संस्थामार्फत आपले सदस्य, अधिकारी आधि कर्मचारी यांच्याकरीता सहकार शिक्षण व प्रशिक्षण आयोजित करील'. अशी तरतूद केली आहे.

त्यानुसार महाराष्ट्र शासनाने दि. १० सप्टेंबर २०१४ चे अधिसूचनेनुसार (वाचावे क्र. ३), महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०(महा. १९६१ चा चोवीस) मधील कलम २४ क उप–कलम (१) नुसार खालील नमूद केलेल्या राज्य संघीय संस्था अथवा शिखर प्रशिक्षण संस्थांना राज्यामध्ये सहकार क्षेत्रातील शिक्षण व प्रशिक्षणासाठी मान्यता दिली आहे.

**राज्यस्तरीय संस्था :–**

१. वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार प्रबंध संस्थान, गणेश खिंड मार्ग, पुणे.
२. यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), राजभवन आवार, बाणेर मार्ग, पुणे.
३. महाराष्ट्र राज्य सहकारी संघ पुणे.
४. महाराष्ट्र राज्य सहकारी बॅक मर्यादित, मुंबई यांचे प्रशिक्षण केंद्र (शिखर) वाशी, नवी मुंबई.
५. पदमश्री डॉ. विठ्ठल विखे–पाटील,सहकार प्रबंध संस्थान, पुणे.
६. धनंजयराव गाडगीळ सहकार प्रबंध संस्थान नागपूर.
७. कृषि बॅकिंग महाविद्यालय, विद्यापीठ मार्ग, पुणे.

**जिल्हास्तरीय संस्था :—**

१. पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्थांचा संघ मर्या. पुणे — या संस्थेला पुणे जिल्हा क्षेत्रामधील सहकारी पतसंस्थांपुरती सहकार शिक्षण व प्रशिक्षण संस्था अशी मान्यता देण्यात आली आहे.

तेव्हा सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांनी, राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या वर नमूद संस्थांकडूनच आपले सदस्य, अधिकारी आणि कर्मचारी यांचे सहकार शिक्षण व प्रशिक्षण घेणे अनिवार्य आहे. राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या संस्थांव्यतिरिक्त इतर संस्थांकडून घेतले जाणारे शिक्षण व प्रशिक्षण हे ग्राहय (अधिकृत) मानले जाणार नाही.

तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम ३० अ मध्ये सहकारी संस्थेचे सदस्य अधिकारी व कर्मचारी यांचे शिक्षण व प्रशिक्षणाकरिता पुढील तरतूद करण्यात आली आहे.

**३० अ सदस्य, अधिकारी व कर्मचारी इत्यादींना सहकाराचे शिक्षण व प्रशिक्षण —**

(१) प्रत्येक संस्था ही, राज्य शासनाकडून अधिनियमाच्या कलम २४ क अन्वये अधिसूचित केलेल्या राज्य संघीय संस्था किंवा राज्य शिखर प्रशिक्षण संस्था यांच्यामार्फत दरवर्षी तिचे सदस्य, अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करील.

(२) शक्य असेल तेथवर, शिक्षण व प्रशिक्षणाचा कालावधी पुढील प्रमाणे असेल —
 (अ) सदस्यांसाठी किमान एक दिवस व कमाल तीन दिवसांपर्यंत,
 (ब) समितीच्या सदस्यांसाठी किमान एक दिवस व कमाल तीन दिवसांपर्यत,
 (क) संस्थेच्या अधिकाऱ्यांसाठी किमान दोन दिवस,
 (ड) कर्मचाऱ्यांसाठी किमान दोन दिवस व कमाल सात दिवसांपर्यंत.

(३) शक्य असेल तेथवर, सदस्यांचा लागोपाठच्या पाच वर्षांमध्ये समावेश करण्यात यावा.

(४) समितीचे सदस्य व कर्मचारी हयांचा, संस्थेच्या उपविधीमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे किंवा पाच वर्षांतून किमान एकदा समावेश करण्यात येईल.

(५) राज्य शासनाकडून अधिसूचित करण्यात येतील अशा राज्य संघीय संस्था किंवा राज्य शिखर प्रशिक्षण संस्था हया, संबंधित संस्थांनी त्यांचेकडे सहकाराचे शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्याची विनंती केल्यावर त्या संस्थांचे सदस्य, अधिकारी व कर्मचारी यांना शिक्षण व प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करतील.

(६) राज्य शासनाकडून अधिसूचित केल्या जाणाऱ्या संघीय संस्था किंवा राज्य शिखर प्रशिक्षण संस्था यांच्याकडे पुढील बाबी असतील —

(अ) अधिनियमाच्या किंवा इतर कोणत्याही अधिनियमाच्या तरतुदीअन्वये नोंदणी केलेली असेल,
(ब) कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य असेल,
(क) संस्थांचे सदस्य, अधिकारी व कर्मचारी यांना सहकाराचे प्रशिक्षण देण्यासाठी त्यांच्या उपविधी तरतूद असेल,
(ड) संस्थांना सहकाराचे शिक्षण व प्रशिक्षण देण्यासाठी पुरेशा पायाभूत सुविधा असतील,
(इ) त्यांच्या आस्थापनेवर किंवा नामिकेवर अर्हताप्राप्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग असेल,
(फ) संस्थांना सहकाराचे शिक्षण व प्रशिक्षण देण्याच्या क्षेत्रात पुरेसा अनुभव असेल,

(७) राज्य संघीय संस्थांना किंवा राज्य शिखर प्रशिक्षण संस्थांना सहकाराचे शिक्षण व प्रशिक्षण देणारे त्यांचे प्रतिनीधी म्हणून सहकाराचे शिक्षण व प्रशिक्षण देण्यासाठी पायाभूत सुविधा व अनुभव असलेल्या इतर संस्थांना नेमण्याचे स्वातंत्र्य असेल.
(८) अधिसूचित राज्य संघीय संस्था किंवा राज्य शिखर प्रशिक्षण संस्था यांना सहकाराचे शिक्षण व प्रशिक्षण निधी देण्यासाठी संस्था दरवर्षी तरतूद करतील व त्याप्रमाणे अंशदान देतील.
(९) संस्थांकडून, राज्य संघीय संस्था किंवा राज्य शिखर प्रशिक्षण संस्था यांना दरवर्षी दिल्या जाणाऱ्या सहकाराचे शिक्षण व प्रशिक्षण निधीतील अंशदानाचे दर, राज्य शासनाकडून वेळोवेळी अधिसूचित करण्यात येतील आणि वेगवेगळया संस्था किंवा संस्थांचे वर्ग यांच्यासाठी वेगवेगळे दर अधिसूचित करता येतील.
(१०) राज्य संघीय संस्था किंवा यथास्थिती राज्य शिखर प्रशिक्षण संस्था यांच्या उपविधीमध्ये विनिर्दिष्ट केलेली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी त्यांच्याकडून शिक्षण व प्रशिक्षण निधीचे व्यवस्थापन करण्यात येईल.

उपरोक्त तरतुदीत नमूद केलेनुसार प्रत्येक संस्थेने राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या संस्थेकडून सहकार शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करावे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५ (२) (Viii) मध्ये संस्थेच्या वार्षिक अंदाजपत्रकाची तरतूद करण्यात आलेली आहे. सदर अंदाजपत्रक तयार करताना संस्थेचे सदस्य, अधिकारी आणि कर्मचारी यांच्याकरिता सहकार शिक्षण व प्रशिक्षणासाठी आर्थिक तरतूद करावी. सदर तरतुदीतून उक्त अधिसूचित संस्थांमार्फत संस्थेचे सदस्य, अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षण घेण्यासाठी खर्च करावे.

वेळोवेळी राज्य शासन, राज्यामध्ये सहकार क्षेत्रातील शिक्षण व प्रशिक्षणासाठी संस्था अधिसूचित करू शकेल सबब उक्त नमूद संस्थांमध्ये वाढ होऊ शकते व त्याप्रमाणे त्या—त्या संस्थाही प्रशिक्षण देण्यासाठी उपलब्ध होणार आहेत.

विषयांकित बाबत विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व) यांना कळविण्यात येते की, आपल्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या सहकारी संस्था कलम २४ क मध्ये नमूद केलेनुसार प्रशिक्षण घेतात किंवा नाही यांचे मासिक सभांमध्ये आढावा घेऊन खाली दिलेल्या नमुन्यात दरमहा माहिती आयुक्त कार्यालयास सादर करावी. लक्षांक घेताना अपेंडिक्सप्रमाणे नोंदणीकृत असलेल्या परंतु अवसायनात नसलेल्या सर्व संस्था पाच वर्षात एकदा तरी त्यांचे सदस्य, अधिकारी आणि कर्मचारी यांना सहकार शिक्षण व प्रशिक्षण देईल याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

सर्व प्रशिक्षणार्थींची प्रतिवर्षी विभागणी करावी. म्हणजेच १ एप्रिल ते ३२ मार्च या कालावधीमध्ये सर्व संस्थांच्या १/५ सदस्य, अधिकारी आणि कर्मचारी/सभासद यांचे त्यावर्षी प्रशिक्षण होईल असे पाहावे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २४ क नुसार प्रशिक्षणाचा पूर्तता अहवालाची खालीलप्रमाणे नोंदवही ठेवण्यात यावी.

**१. विभागस्तरीय नोंदवही :**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २४ क नुसार प्रशिक्षणाचा लक्षांक पूर्तता अहवाल

माहे .......... सन ..........

| अ. क्र. | जिल्हा | नोंदणीकृत एकूण संस्था | लक्षांक | | | | | पूर्तता | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | संस्था (संख्या) | प्रशिक्षण कार्यक्रम (संख्या) | पदाधिकारी/ संचालक (संख्या) | कर्मचारी/ अधिकारी (संख्या) | सभासद (संख्या) | संस्था संख्या (संख्या) | प्रशिक्षण कार्यक्रम (संख्या) | पदाधिकारी/ संचालक (संख्या) | कर्मचारी/ अधिकारी (संख्या) | सभासद (संख्या) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |

टिप : १. स्तंभ क्र. ४ मध्ये यावर्षी प्रशिक्षणासाठी निवडलेल्या संस्थांचा संख्यात्मक लक्षांक नमूद करावा. प्रत्येक सहकारी संस्थेला पाच वर्षातून किमान एकदा प्रशिक्षण मिळेल अशा प्रकारे लक्षांक घ्यावा.

२. स्तंभ क्र. ५ मध्ये वर्षभरात घ्यावयाचे प्रशिक्षण कार्यक्रम नमूद करावे.

**विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था कार्यालयाने वर नमूद अहवाल दरमहा या कार्यालयास दि. ७ पर्यंत सादर करावा.**

## २. जिल्हास्तरीय नोंदवही :

**माहे ............ सन ............**

| अ. क्र. | जिल्हा | नोंदणीकृत एकूण संस्था | लक्षांक | | | | | पूर्तता | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | संस्था (संख्या) | प्रशिक्षण कार्यक्रम (संख्या) | पदाधिकारी/ संचालक (संख्या) | कर्मचारी/ अधिकारी (संख्या) | सभासद (संख्या) | संस्था संख्या (संख्या) | प्रशिक्षण कार्यक्रम (संख्या) | पदाधिकारी/ संचालक (संख्या) | कर्मचारी/ अधिकारी (संख्या) | सभासद (संख्या) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |

टिप : १. स्तंभ क्र. ४ मध्ये यावर्षी प्रशिक्षणासाठी निवडलेल्या संस्थांचा संख्यात्मक लक्षांक नमूद करावा. प्रत्येक सहकारी संस्थेला पाच वर्षातून किमान एकदा प्रशिक्षण मिळेल अशा प्रकारे लक्षांक घ्यावा.

२. स्तंभ क्र. ५ मध्ये वर्षभरात घ्यावयाचे प्रशिक्षण कार्यक्रम नमूद करावे.

## ३. तालुकास्तरीय नोंदवही :

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २४ क नुसार प्रशिक्षणाचा लक्षांक पूर्तता अहवाल**

**माहे ............ सन ............**

| अ. क्र. | जिल्हा | नोंदणीकृत एकूण संस्था | लक्षांक | | | | | पूर्तता | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | संस्था (संख्या) | प्रशिक्षण कार्यक्रम (संख्या) | पदाधिकारी/ संचालक (संख्या) | कर्मचारी/ अधिकारी (संख्या) | सभासद (संख्या) | संस्था संख्या (संख्या) | प्रशिक्षण कार्यक्रम (संख्या) | पदाधिकारी/ संचालक (संख्या) | कर्मचारी/ अधिकारी (संख्या) | सभासद (संख्या) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |

टिप : १. स्तंभ क्र. ४ मध्ये यावर्षी प्रशिक्षणासाठी निवडलेल्या संस्थांचा संख्यात्मक लक्षांक नमूद करावा. प्रत्येक सहकारी संस्थेला पाच वर्षातून किमान एकदा प्रशिक्षण मिळेल अशा प्रकारे लक्षांक घ्यावा.

२. स्तंभ क्र. ५ मध्ये वर्षभरात घ्यावयाचे प्रशिक्षण कार्यक्रम नमूद करावे.

तरी उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे योग्य कार्यवाही करण्यात यावी. तसेच प्रत्येक विभागीय कार्यालयाने त्यांचेकडील वर नमूद दरमाह अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**सदर कायद्यातील तरतुदीची प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी खालीलप्रमाणे कामकाज करावे.**

१. सहाय्यक निबंधक/उपनिबंधक/जिल्हा उपनिबंधक/ यांनी ते ज्या संस्थेचे निबंधक असतील त्या संस्थांची यादी तयार करून त्या संस्थांत एकूण किती सदस्य, अधिकारी आणि कर्मचारी कार्यरत आहेत ही माहिती घ्यावी.

२. तद्नंतर १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०२० या कालावधीत सहकारी शिक्षण व प्रशिक्षण द्यावयाच्या संस्थेच्या सदस्य, अधिकारी आणि कर्मचारी यांची समान (१/५ प्रतिवर्षी) विभागणी करावी.

३. प्रत्येक संस्थेला त्या संस्थेच्या गरजेनुसार व प्रकारानुसार कोणत्या बाबींचे सहकार शिक्षण व प्रशिक्षण देणे आवश्यक आहे याची विषयसूची व अभ्यासक्रम तयार करावा.

४. प्रत्येक सहकारी संस्थेला त्यांचे गरजेनुरूप प्रशिक्षण देणेबाबत पत्रव्यवहार करून त्या सहकारी संस्थांचे दरमाह दिलेल्या उद्दिष्टाप्रमाणे प्रशिक्षणार्थींचा सहभाग घेण्याच्या दृष्टीने आवश्यक ती सर्व उपाययोजना करावी.

५. राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या संस्थांकडून व सदरचे शिक्षण प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करावे.

पुणे

(चंद्रकांत दळवी)
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे.